**रेग्युलर दरखास्त क्र. ०७/२०१३ मध्ये नि. क्र.५१ वर आदेश**

धनकोतर्फे दाखल करण्यात आलेला अर्ज वाचला. उभय पक्षाच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

२. उपरोक्त धनकोचे असे कथन आहे की, ऋणको क्र. ३, ४/ब व ८ हे मयत असुन त्यांना कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे धनकोने ऋणको क्र. ३, ४/ब व ८ यांचे नाव दरखास्त अर्जातून कमी करण्याची विनंती केलेली आहे.

३. ऋणको नं. २ यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविताना असे कथन केले आहे की, अर्जाचे कलम नं. २ मधील मजकूर खरा आहे. अर्जाचे कलम नं. २ मधील ऋणको नं. ३, ४/ब व ८ हे मयत असल्याचा मजकूर खरा व आहे. धनको यांनी हेतुपुरस्सर मयताबाबत आवश्यक ती दखल विहीत मुदतीमध्ये घेतलेली नाही. दिवाणी दावा नं. ४५/२००६ चे नाराजीने मा. जिल्हा न्यायालय अंबाजोगाई येथे रे.द.अ.नं. २२/२०१६ दाखल आहे. करिता पुर्ण दरखास्त ही अॅबेट होते. त्यामुळे नि. ५१ हा अर्ज खर्चासह फेटाळणे योग्य होईल.

४. ऋणको क्र. ३, ४/ब व ८ मयत झाले असल्याची बाब वादग्रस्त नाही. किंबहुना ऋणको क्र. २ ने त्याच्या म्हणण्यामध्ये ऋणको नं. ३, ४/ब व ८ हे मयत असल्याचा मजकूर खरा असल्याचे कथन केलेले आहे. तसेच नि.क्र. ५४ वरील कागदपत्राच्या यादीवरुन त्यांनी दाखल केलेले ऋणको क्र. ३ व ४/ब त्यांचे मृत्यू प्रमाणपत्रावरुन मयत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे ऋणको क्र. ३, ४/ब व ८ चे नाव दरखास्त अर्जातून कमी करणे गरजेचे आहे. धनको तर्फे नोंदविण्यात आलेले आक्षेप हे मोघम स्वरुपाचे असल्याचे दिसून येते. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो.

रेग्युलर दरखास्त क्र. ०७/२०१३
सीएनआरक्र.एमएचबीआय१००००६२८२०१३
शेख अफसर वि..फातेमाबी

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जातील ऋणको क्र. ३, ४/ब व ८ हे मयत असल्याने त्यांचे नाव दरखास्त अर्जातून वगळण्यास परवानगी देण्यात येते.

Digitally signed by PRAVIN VISHWAS PATIL
Date: 2022.06.09 16:54:13 +0530

दिनांक ०९.०६.२०२२

(पी.व्ही. पाटील )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

-:CERTIFICATE:-

Judgment/order in (Order below Exh.1 in R.D. No.07/2013)

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.Y.Gore |
| Court Name | :- | The Court of 2nd Jt.Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Kaij. |
| Date of decision | :- | 09 /06/2022 |
| Order signed by PO. on | :- | 09 /06/2022 |
| Order uploaded on | :- | 09 /06/2022 |